0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दि. ०२/०८/२०११ रोजीच्या पत्रासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५६/२०११/जा.६३१, दि. ०५/०८/२०११, २४/०८/२०११ व ०३/०९/२०११.

३) सायबर टेक कंपनीचे दिनांक १६/०८/२०११ रोजीचे निवेदन.

४) सायबर टेक कंपनीचे वतीने ॲड.अर्षद शेख यांनी दि.२३/८/२०११ रोजी सादर केलेले निवेदन

५) तपासी पोलीस अधिकारी यांचे दि. २३/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले लेखी अभिवेदन.

६) टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे मालक बहादूर यादव, चालक रामनरेश वर्मा, क्लिनर हरिशंकर वर्मा यांचे स्वतंत्र निवेदन तसेच संजयकुमार व्ही. वर्मा व अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी यांचे दिनांक ३०/०८/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले एकत्रित निवेदन.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वागळे इस्टेट पोलिस स्टेशन यांचे दि. ३०/०८/२०११ रोजीचे अभिवेदन.

८) सुरेंद्रकुमार वर्मा यांचे दिनांक ३०/०८/२०११ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५६/२०११/जा.८०८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :२२/१०/२०११.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी / कर्मचारी दोन पंचासह रात्री ११:०० वाजता कॅडबरी कंपनी समोरील पार्कींग प्लाझा, मुंबई नाशिक हायवे, ठाणे या ठिकाणी आले असता, मिळालेल्या बातमीनुसार उक्त ठिकाणी टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ उभा असल्याचे आढळून आले. टँकरवर उपस्थित असलेल्या इसमाकडे टँकरमध्ये डिझेल आहे किंवा कसे, याबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता, त्याच्याकडून संशयास्पद उत्तरे मिळाली. त्यामुळे सदर टँकर दुपारी ज्या ठिकाणी खाली

करणेत आला, त्या सायबर टेक सिस्टम ॲण्ड साफ्टवेअर कंपनी लि., प्लॉट नं. ६३/६५, रोड नं. २१/३४, वागळे इस्टेट, ठाणे (प) येथे पंचासमक्ष आणण्यात आला. सदर कंपनीतील अधिकाऱ्यांची परवानगी घेवून टँकर खाली करुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना बोलावून कंपनीतील चावी नुसार टँकरचे चारही कप्पे उघडून पाहण्यात आले. त्यापैकी कप्पा क्र. १ व ३ रिकामा आढळला व कपा क्र. २ मध्ये २५९५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये ५२६ लिटर डिझेल असे एकूण ३१२१ लिटर डिझेल आढळून आले.

सदरच्या डिझेलबाबत टँकरचे चालक रामनरेश ठाकूरदिन वर्मा व क्लिनर हरिशंकर मोतीलाल यादव याच्याकडे पंचासमक्ष विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, ते चालवित असलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ हा बहादूर रामराव यादव याच्या मालकीचा असून सद्य स्थितीत संजयकुमार वर्मा, सुरेंद्रकुमार वर्मा व अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी यांनी भागीदारी (ठेकेदारी) या तत्त्वावर चालविण्यास घेतला आहे. दिनांक २३/०७/२०११ रोजी अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापुरी हे त्यांना एच.पी.सी.एल. टर्मिनल, वाशी येथे घेऊन गेले व गाडीमध्ये १२००० लिटर डिझेल भरुन घेतले व त्यांना कंपनी बाहेरील पार्किंगमध्ये दिनांक २५/०७/२०११ पर्यंत थांबण्यास सांगितले. दिनांक २५/०७/२०११ रोजी सकाळी ९:३० वाजता अजय यादव त्या ठिकाणी आले आणि टँकर सायबर टेक सिस्टिम ॲण्ड सॉफ्टवेअर या कंपनीत डिझेल खाली करुन घेण्यासाठी घेऊन आले. कंपनीच्या गेटवर आल्यावर अजय यादव हे बाहेर उभे राहिले. तत्पूर्वी गेटवर उभे असलेले सुरेंद्रकुमार वर्मा हे टँकर सोबत कंपनीच्या आत आले. टँकर ज्या ठिकाणी खाली करावयाचा आहे त्या ठिकाणी कंपनीतील कर्मचाऱ्यांना सुरेंद्रकुमार यांनी बोलावून घेतले व स्वत: टँकरवर चढून कर्मचाऱ्यांनी दिलेल्या चावीनुसार कप्पे उघडून कर्मचाऱ्यांसमक्ष डिपने मोजमाप घेतले व त्यांना टँकरच्या खाली उभे करुन, भूमिगत टाकीचा पाईप टँकरच्या नोझलला जोडून सुरेंद्र वर्मा टँकरवर उभे राहून, प्रत्येक कप्प्यांशी संबंधित असलेले खटके चालू/बंद करण्याच्या सुचना करीत होते. त्यानुसार तो ते चालू बंद करीत राहिले. त्यानंतर टँकर खाली झाल्याने सुरेंद्र वर्मा यांनी त्यांना सांगून टँकरवरील कप्प्यांची झाकणे बंद करण्यासाठी टँकरवर बोलविले. ते टँकरवर कप्पे बंद करण्यासाठी गेले असता कप्पा क्रमांक २ व ४ मध्ये डिझेल असल्याचे निदर्शनास आले. परंतू सुरेंद्र वर्मा यानी त्यांना सदरची बाब कंपनीच्या निदर्शनास आणू नको असे निर्देश केले. त्या नंतर त्यांनी सांगितल्यानुसार टँकर घेऊन कॅडबरी कंपनी समोरील पार्किंग प्लाझामध्ये उभा केला व सुरेंद्र वर्मा हे चलनाची कॉपी घेऊन निघून गेले. त्यानंतरच्या कालावधीनंतर अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेऊन खात्रीलायक बातमीच्या अनुषंगाने टॅकरमधील डिझेलची शहानिशा करण्यासाठी त्यांना पुन्हा वितरीत केलेल्या (डिझेल) सायबर टेक कंपनीत घेऊन आले. कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या मदतीने कंपनीच्या चावीच्या सहाय्याने टँकरचे कप्पे उघडून पडताळणी केली असता, कप्पा क्र. १ व ३ रिकामा असल्याचे व कप्पा क्र. २ मध्ये २५९५ लिटर डिझेल व ४ मध्ये ५२६ लिटर डिझेल असे एकूण ३१२१ लिटर डिझेल आढळून आले. ते संजयकुमार वर्मा, सुरेंद्रकुमार वर्मा

CONTROLLER OF RATIONING

व अजय गोविंद यादव हे कोठे विकणार होते या बाबत त्यांना काही माहित नाही, असे सांगितले. त्याप्रमाणे रामनरेश ठाकूरदिन वर्मा व हरिशंकर मोतीलाल यादव यांचा वरील जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला.

त्याचप्रमाणे टँकरमध्ये असलेल्या ३१२१ लिटर डिझेल बाबत कंपनीतील कर्मचारी संजय दयाशंकर सिंग, प्रविण विनायक परब यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी पंचासमक्ष असे सांगितले की, दिनांक २५/०७/२०११ रोजी दुपारी डि.ओ.सी. क्रमांक ११०१३९३० अे.आय. नुसार टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ हा डिझेलच्या डिलिव्हरी करिता आला असता, पडताळणी करुन कंपनीच्या स्टोअरेज टाकीत उतरविण्यात आला. तसेच गाडी मागेपुढे करुन शिल्लक साठ्याची खातरजमा केली असता, टँकरमध्ये डिझेल असल्याचे निदर्शनास आले नाही. तद्नंतर टँकर निघून गेला. परंतू कंपनीतील स्टोअरेज टाकीतील डिझेलचे मोजमाप केले असता ते कमी असल्याचे आढळून आल्याने टँकरचे ठेकेदार सुरेंद्र वर्मा यांना त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८३३७७७२१४ वर संपर्क साधून विचारले असता, त्याने वितरण झाले असून आता त्याला त्याबाबत काहीही माहीत नाही, अशी उडवाउडवीची उत्तरे दिली. याबाबत वरील कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र लेखी जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन शासनाचे अनुदानित दराचे डिझेल उपभोक्त्याला पूर्णपणे न देता त्यांची व शासनाची फसवणूक करुन सदर डिझेल चोरी करुन काळ्या बाजाराने विक्री करण्याच्या उद्देशाने साठवणूक व वाहतूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच (२) दि मोटार स्पिरीट ॲन्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रिब्युशन ॲण्ड प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) आदेश २००५ चे कलम ३, ४, ५ व ६ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ८७/२०११, दि.२६/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ | १ नग | ८,००,०००/- |
| २ | उक्त टँकरमधील डिझेल साठा | ३१२१ लि. | १,४५,४३९/- |
| ३ | पितळी डिप | १ नग | १,०००/- |
| | | एकूण | ९,४६,४३९/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
FICE

प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.१६/०८/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस सायबर टेक कंपनीचे कर्मचारी श्री संजय सिंग व श्री प्रविण परब हे उपस्थित राहीले व त्यांनी कंपनीचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस आरोपी संजयकुमार वर्मा व अजय गोविंद यादव उपस्थित राहीले. तथापी, त्यांनी त्यांचे निवेदन सुनावणीचे वेळी सादर केले नाही. सदर सुनावणीस इतर आरोपी / अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दिनांक २३/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस सायबर टेक कंपनीचे वतीने ॲड अर्षद शेख वकालतनाम्यासह उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस संजयकुमार वर्मा व अजय गोविंद यादव उपस्थित राहीले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून मौखिक विनंती केली. सबब, पुढील सुनावणी दिनांक ३०/०८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ३०/०८/२०११ रोजीच्या सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली व पुढील सुनावणी दिनांक १३/०९/२०११ रोजी ठेवण्यात आली. तथापी, तपासी पोलीस अधिकारी यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये अभिवेदन तसेच टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे मालक बहादूर यादव, चालक रामनरेश वर्मा, क्लिनर हरिशंकर वर्मा, संजयकुमार व्ही. वर्मा व अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये निवेदन टपालामार्फत या कार्यालयात सादर केले.

दिनांक १३/०९/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे मालक बहादूर यादव, चालक, संजयकुमार व्ही. वर्मा व अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी व सुरेंद्रकुमार वर्मा उपस्थित राहीले. सुरेंद्रकुमार वर्मा यांनी त्यांचे वाचावे क्र ७ अन्वये निवेदन टपालामार्फत या कार्यालयात सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## <u>युक्तीवाद</u> :-

दिनांक १६/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित सायबर टेक कंपनीचे कर्मचारी श्री संजय सिंग व श्री प्रविण परब यांनी युक्तिवाद केला की, एचपीसीएल कंपनीकडे दिनांक २१/०७/२०११ रोजी १२ कि.लि. डिझेलची मागणी करुन त्याकरीता रुपये ५,५९,२६१/- चे पेमेंट केले होते. त्यानुसार दिनांक २५/०७/२०११ रोजी चलन क्र. १०५३३६४ अन्वये टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ मधून डिझेल वितरणाकरीता आला. डिझेल साठवणूक

टँकमध्ये भरल्यानंतर चलनावर सही केली. त्यांनतर टँकमधील डिझेलचे मोजमाप केले असता, डिझेलचा साठा कमी आढळून आला. याबाबत ताबडतोब टँकर चालकाशी संपर्क साधून डिझेलचा पुरवठा कमी केल्याची माहिती सांगीतली. त्याचेवेळेस दक्षता पथकाचे अधिकारी चालकासमवेत आले व त्यांनी चालकास विचारणा करुन तपासणी केली असता, ३१०० लि. डिझेल कमी असल्याचे आढळले. डिझेल कमी असल्याबाबत एचपीसीएल कंपनीला यापूर्वी दि.२६/०७/२०११ रोजी ई-मेलद्वारे कळविण्यात आले. एचपीसीएल कंपनीला या डिझेलची पूर्ण रक्कम भरणा केली असल्याने सदरचे जप्त केलेले डिझेल त्यांच्या कंपनीला परत करण्यात यावे, असे सांगून तसे कंपनीचे निवेदन सादर केले.

दिनांक २३/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस सायबर टेक कंपनीचे वतीने वकालतनाम्यासह उपस्थित ॲड. अर्षद शेख यांनी युक्तिवाद केला की, गुन्ह्यात जप्त केलेले ३१२१ लिटर डिझेल सायबर टेक कंपनीचे असून, ते कंपनीला परत करावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

तपासी पोलीस अधिकारी यांनी टपालामार्फत सादर केलेल्या दिनांक २३/०८/२०११ व ३०/०८/२०११ रोजीच्या अभिवदनात, यातील आरोपीतांनी सदर गुन्ह्यात अवैध मार्गाने बेकायदेशिररित्या टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ मधून ३१२१ लिटर्स डिझेल काढून शासन अनुदानीत दराचे डिझेल उपभोक्त्याला पुर्णपणे न देता त्याची चोरी करुन काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी साठवणूक करुन वाहतूक केल्याचे आतापर्यंतचे तपासात दिसून येत असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर जप्त डिझेलचा साठा पोलीस स्टेशनचे आवारात ठेवण्यात आला असून हा मुद्देमाल अतिशय ज्वलनशिल आहे व धोक्याचे आहे. तरी सदर मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याबाबत आदेश होण्यास विनंती असल्याचे नमुद केले आहे. तसेच गुन्ह्यातील जप्त टँकर आरोपीचे ताब्यात देण्यात येवू नये, असेही नमुद केले आहे.

टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे मालक बहादूर यादव यांनी टपालामार्फत सादर केलेल्या निवेदनात, जप्त केलेला सदरचा टँकर त्यांचे स्वत:चे मालकीचा आहे. हा टँकर संजयकुमार वर्मा व अजय गोविंद यादव या दोघांना एकत्रितपणे दिनांक १० जानेवारी २०११ पासून ११ महिन्याकरीता भाड्याने चालविण्याकरीता दिला आहे. या टँकरने ते तेल कंपनीतून डिझेल व पेट्रोलची वाहतूक करतात. डिझेलची चोरी करतांना टँकर जप्त केला आहे. त्याचा टँकर भाड्याने चालविण्याकरीता दिला असल्याने त्याचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. तसेच टँकरमध्ये पकडलेले डिझेल कोठून आणले व कोठे विकणार होते, याची त्याला काहीही माहीती नाही. सदरचा जप्त टँकर त्याने बॅकेतून कर्जाने घेतला असून, कर्जाची अजून परतफेड व्हायची आहे. या टँकरवर त्याच्या कुटूंबाचे जीवन अवलंबून आहे. तरी या गुन्ह्याची त्याचा काहीही संबंध नसल्याने जप्त केलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ त्याला परत मिळावा, असे नमुद केले आहे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
AI

0006 टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे चालक रामनरेश वर्मा व क्लिनर हरिशंकर यादव यांनी टपालामार्फत सादर केलेल्या एकत्रित निवेदनात, एचपीसीएल तेल कंपनी वाशी येथून सायबर टेक कंपनीसाठी डिझेल भरले होते. दिनांक २३/०७/२०११ रोजी शनिवार व दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे कंपनी बंद होती. त्यावेळी हा टँकर सायबर टेक कंपनीच्या बाहेर उभा केला. दिनांक २५/०७/२०११ रोजी टँकर मधील डिझेल सायबर टेक कंपनीत खाली केला. टँकर संपुर्ण खाली झाल्यानंतर कंपनीच्या साहेबांनी हा टँकर पुर्णपणे चेक करुन टँकर परत लॉक मारुन ओके केला व कंपनीचा शिक्का मारुन टँकर कंपनीच्या बाहेर सोडला. त्यांनतर टँकर घेवून तो घराकडे निघाला व तिकडे टँकर पार्क केला. रात्री क्लिनरने त्याला फोन करुन सांगीतले की, टँकर जवळ पोलीस उभी आहे. त्यानंतर तो तेथ गेला असता, टँकरमध्ये डिझेल असल्याचे सांगीतले. परंतू याबाबत त्याला काहीही माहिती नसल्याचे नमुद केले आहे.

संजयकुमार व्ही. वर्मा व अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी यांनी टपालामार्फत सादर केलेल्या एकत्रित निवेदनात, वागळे इस्टेट पोलीस स्टेशनमध्ये जप्त केलेल्या टँकर क्र.एमएच ०४ एच ५६५२ चे मालक बहादूर यादव हे आहेत. त्यांच्याकडून हा टँकर त्यांनी दोघांमिळून दिनांक १० जानेवारी २०११ पासून ११ महिन्याकरीता भाड्याने चालविण्यासाठी घेतला होता. या टँकरने एचपीसीएल तेल कंपनीतून डिझेल/पेट्रोल भरुन चलनात लिहिलेल्या पत्त्यावर वितरण करण्याचे काम करतात. याप्रमाणे दि. २३/०७/२०११ रोजी डिझेल भरण्याकरीता टँकर कंपनीत घेवून जाण्यास ड्रायव्हरला सांगीतले. दिनांक २३/०७/२०११ रोजी टँकरमध्ये डिझेल भरल्यानंतर दुसऱ्या दिवशी रविवार असल्याने हा टँकर कंपनीच्या बाहेर उभा केला. त्यानंतर डिझेलने भरलेला हा टँकर सायबर टेक कंपनी ठाणे येथे खाली करण्याकरीता दिनांक २५/०७/२०११ रोजी ड्रायव्हरला फोन करुन सांगीतले. त्याप्रमाणे दिनांक २५/०७/२०११ रोजी सायबर टेक कंपनीमध्ये टँकरमधील डिझेल खाली केले व ड्रायव्हरने त्यांना फोन करुन संपुर्ण डीझेल सायबर टेक कंपनीमध्ये खाली केल्याचे व चलन घेण्यास सांगीतले. त्याच दिवशी ड्रायव्हरला भेटल्यानंतर त्यांने संपुर्ण १२००० लिटर डिझेल खाली केल्याचे चलन त्यांना दिले. त्यादिवशी खुप रात्र झाली असल्याने टँकर चांगल्या जागेत पार्क करुन दुस-या दिवशी म्हणजे दिनांक २६/०७/२०११ रोजी हा टँकर तेल कंपनीमध्ये घेवून जाण्यास ड्रायव्हरला सांगीतले व ते दोघेही तेथून निघून गेले. पोलीसांनी त्यांना पोलीस स्टेशनला बोलावले. ते पोलीस स्टेशनमध्ये गेले तेंव्हा त्यांना समजले की, हा टँकर रेशन अधिकाऱ्यांनी पकडून पोलीस स्टेशनमध्ये जप्त केला आहे. सायबर टेक कंपनीमध्ये संपुर्ण डिझेल खाली केल्याचे ड्रायव्हरने सांगून त्याचे चलन त्यांना दिले होते. त्यामुळे या टँकरमधील सपुर्ण डिझेल सायबर टेक कंपनीमध्ये खाली केले. परंतु या टँकरमध्ये ३१०० लिटर डिझेल ड्रायव्हरने कोठून आणले याबाबत त्यांना काहीही माहित नाही व त्यांचा याच्याशी काहीही संबंध नाही. जप्त केलेला टँकर क्र.एमएच ०४ एच ५६५२ हा त्यांनी भाड्याने चालविण्याकरीता घेतला असून, या गुन्ह्याशी त्यांचा काहीही संबंध

नसल्याने हा टँकर परत मिळावा, असे नमुद करुन टँकर भाड्याने चालविण्याकरीता घेतल्याचा करारनामा सादर केला आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी / अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी पुढील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २५/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खबरीनुसार या कार्यालयाच्या दक्षता पथकातील अधिकारी पंचासमवेत कॅडबरी कंपनी समोरील पार्कींग प्लाझा, मुंबई नाशिक हायवे, ठाणे या ठिकाणी आले असता, उक्त ठिकाणी टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ उभा असल्याचे आढळून आले. टँकरवर उपस्थित असलेल्या इसमाकडे टँकरमध्ये डिझेल आहे किंवा कसे, याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडून संशयास्पद उत्तरे मिळाली. त्यामुळे सदर टँकर दुपारी ज्या ठिकाणी खाली करणेत आला, त्या सायबर टेक सिस्टम ॲण्ड साफ्टवेअर कंपनी लि., प्लॉट नं. ६३/६५, रोड नं. २१/३४, वागळे इस्टेट, ठाणे (प) येथे पंचासमक्ष आणण्यात आला. सदर कंपनीतील अधिकाऱ्यांची परवानगी घेवून टँकर खाली करुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना बोलावून कंपनीतील चावी नुसार टँकरचे चारही कप्पे उघडून पाहण्यात आले. त्यापैकी कप्पा क्र. १ व ३ रिकामा आढळला व कप्पा क्र. २ मध्ये २५९५ लिटर डिझेल व कप्पा क्र. ४ मध्ये ५२६ लिटर डिझेल असे एकुण ३१२१ लिटर डिझेल आढळून आले. सदरच्या डिझेलबाबत टँकरचे चालक रामनरेश ठाकूरदिन वर्मा व क्लिनर हरिशंकर मोतीलाल यादव याच्याकडे विचारणा केली असता, दिनांक २३/०७/२०११ रोजी अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापुरी हे त्यांना एच.पी.सी.एल. टर्मिनल, वाशी येथे घेऊन गेले व गाडीमध्ये १२००० लिटर डिझेल भरुन घेतले व त्यांना कंपनी बाहेरील पार्किंगमध्ये दिनांक २५/०७/२०११ पर्यंत थांबण्यास सांगितले. दिनांक २५/०७/२०११ रोजी सकाळी ९:३० वाजता अजय यादव त्या ठिकाणी आले आणि टँकर सायबर टेक सिस्टिम ॲण्ड सॉफ्टवेअर या कंपनीत डिझेल खाली करुन घेण्यासाठी घेऊन आले. कंपनीच्या गेटवर आल्यावर अजय यादव हे बाहेर उभे राहिले. तत्पूर्वी गेटवर उभे असलेले सुरेंद्रकुमार वर्मा हे टँकर सोबत कंपनीच्या आत आले. टँकर ज्या ठिकाणी खाली करावयाचा आहे त्या ठिकाणी कंपनीतील कर्मचाऱ्यांना सुरेंद्रकुमार यांनी बोलावून घेतले व स्वत: टँकरवर चढून कर्मचाऱ्यांनी दिलेल्या चावीनुसार कप्पे उघडून कर्मचाऱ्यांसमक्ष डिपने मोजमाप घेतले व त्यांना टँकरच्या खाली उभे करुन, भूमिगत टाकीचा पाईप टँकरच्या नोझलला जोडून सुरेंद्र वर्मा टँकरवर उभे राहून, प्रत्येक कप्प्यांशी संबंधित असलेले खटके चालू/बंद करण्याच्या सुचना करीत होते. त्यानुसार तो ते चालू बंद करीत राहिले. त्यानंतर टँकर

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

0008 खीली झाल्याने सुरेंद्र वर्मा यांनी त्यांना सांगून टँकरवरील कप्प्यांची झाकणे बंद करण्यासाठी टँकरवर बोलविले. ते टँकरवर कप्पे बंद करण्यासाठी गेले असता कप्पा क्रमांक २ व ४ मध्ये डिझेल असल्याचे निदर्शनास आले. परंतू सुरेंद्र वर्मा यानी त्यांना सदरची बाब कंपनीच्या निदर्शनास आणू नको असे निर्देश केले. त्या नंतर त्यांनी सांगितल्यानुसार टँकर घेऊन कॅडबरी कंपनी समोरील पार्किंग प्लाझामध्ये उभा केला व सुरेंद्र वर्मा हे चलनाची कॉपी घेऊन निघून गेले. डिझेलचा साठा संजयकुमार वर्मा, सुरेंद्रकुमार वर्मा व अजय गोविंद यादव हे कोठे विकणार होते या बाबत त्यांना काही माहित नसल्याचे सांगितले. यावरुन सदरचा टँकर व त्यामधील डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, यातील आरोपीतांनी सदर गुन्ह्यात अवैध मार्गाने बेकायदेशिररित्या टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ मधून ३१२१ लिटर्स डिझेल काढून शासन अनुदानीत दराचे डिझेल उपभोक्त्याला पुर्णपणे न देता त्याची चोरी करुन काळ्या बाजारात विक्री करण्यासाठी साठवणूक करुन वाहतूक केल्याचे आतापर्यंतचे तपासात दिसून येत असल्याचे निष्पन्न होत आहे. सदर जप्त डिझेलचा साठा पोलीस स्टेशनचे आवारात ठेवण्यात आला असून हा मुद्देमाल अतिशय ज्वलनशिल आहे व धोक्याचे आहे. तरी सदर मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याबाबत आदेश होण्यास विनंती केली आहे. सायबर टेक कंपनीने केलेल्या खुलाशात, एचपीसीएल कंपनीकडे दिनांक २१/०७/२०११ रोजी १२ कि.लि. डिझेलची मागणी करुन त्याकरीता रुपये ५,५९,२६१/- चे पेमेंट केले होते. त्यानुसार दिनांक २५/०७/२०११ रोजी चलन क्र. १०५३३६४ अन्वये टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ मधून डिझेल वितरणाकरीता आला. डिझेल साठवणूक टँकमध्ये भरल्यानंतर चलनावर सही केली. त्यांनतर टँकमधील डिझेलचे मोजमाप केले असता, डिझेलचा साठा कमी आढळून आला. याबाबत ताबडतोब टँकर चालकाशी संपर्क साधून डिझेलचा पुरवठा कमी केल्याची माहिती सांगीतली. त्याचेवेळेस दक्षता पथकाचे अधिकारी चालकासमवेत आले व त्यांनी चालकास विचारणा करुन तपासणी केली असता, ३१०० लि. डिझेल कमी असल्याचे आढळले. डिझेल कमी असल्याबाबत एचपीसीएल कंपनीला यापूर्वी दि.२६/०७/२०११ रोजी ई-मेलद्वारे कळविण्यात आले असल्याचे नमुद केले आहे. तसेच सायबर टेक कंपनीचे कर्मचारी, श्री संजय सिंग व श्री प्रविण परब यांनी घटनास्थळी अधिकाऱ्यांना दिलेल्या जबाबात, कंपनीतील चावीनुसार टँकरमधील प्रत्येक कप्पा उघडून डिझेलच्या साठ्याची पडताळणी केली. त्यानुसार गाडीतील डिझेलचा साठा कंपनीच्या स्टोअरेज टँकमध्ये उतरवून घेण्यात आला. तसेच गाडी मागे पूढे करुन टँकरमध्ये साठा शिल्लक असल्याची खातरजमा केली असता, टँकरमध्ये डिझेल असल्याचे निदर्शनास आले नाही. टँकर कंपनीच्या बाहेर निघून गेल्यानंतर १० ते १५ मिनीटांनी इलेक्ट्रीशीयनने सांगीतले की, उतरविलेल्या साठ्यापेक्षा डिझेल साठा कमी आहे.

याबाबत, चालकाशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून विचारणा केली. परंतु चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली 009
असल्याचा जबाब दिला आहे.

जप्त टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे चालक रामनरेश वर्मा व क्लिनर हरिशंकर यादव यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, टँकरमधील डिझेलचे वितरण करण्यासाठी अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी हे टँकरसोबत सायबर टेक कंपनीमध्ये आले. तेथे कंपनीच्या बाहेर सुरेंद्रकुमार वर्मा उभे होते. टँकरमधील डिझेलचे वितरण झाल्यानंतर सुरेंद्रकुमार वर्मा यांने सांगीतल्याप्रमाणे टँकरचे कप्पे बंद करण्यासाठी टँकरवर चालक गेला असता, कप्पा क्र. २ व ४ मध्ये डिझेल असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. याबाबत सुरेंद्रकुमार वर्मा याला सांगीतले असता, सदरची बाब कंपनीच्या निदर्शनास आणू नको, असे वर्मा यांने सांगीतले व तसे चालकाने क्लिनर याला ही बाब सांगीतली. त्यानंतर टँकर घेवून तो कॅडबरी कंपनी समोरील पार्कीग प्लाझामध्ये उभा केला व सुरेंदकुमार वर्मा हा चलन घेवून निघून गेला असल्याचा जबाब दिला आहे. यावरुन आरोपी यांनी सर्व संबंधिताशी संगणमत करुन टँकरमधील डिझेलचे नियोजित ठिकाणी संपुर्ण वितरण न करता जाणीवपूर्वक व स्वत:च्या फायद्यासाठी त्या टँकरमधील डिझेल काळ्याबाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने चोरी करण्याचा त्यांचा बेकायदेशिर कृत्याबाबतचा उद्देश सिध्द होतो. त्याचप्रमाणे तेल कंपनीकडे मागणी केल्याप्रमाणे डिझेलचे वितरण पुर्ण केले आहे किंवा नाही, याची जबाबदारी संबंधित सायबर टेक येथील कर्मचाऱ्याची असतांना सुध्दा त्यांनी तसे केले नसल्याचे सद्य:परिस्थित माझ्यासमोर आलेल्या वस्तुस्थितीवरुन दिसून येते. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून, मा.न्यायालयात सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, काळाबाजार करण्याच्या उद्देशाने आरोपी यांनी चोरी केलेला टँकरमधील डिझेलचा साठा अवैध ठरत असल्याने सदरचा संपुर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ हा बहादूर यादव यांच्या मालकीचा असल्याचे त्यांनी सादर केलेल्या निवेदनावरुन दिसून येते. तसेच बहादूर यादव यांनी केलेल्या खुलाशात, जप्त केलेला सदरचा टँकर हा संजयकुमार वर्मा व अजय गोविंद यादव या दोघांना एकत्रितपणे दिनांक १० जानेवारी २०११ पासून ११ महिन्याकरीता भाड्याने चालविण्याकरीता दिला असून, टँकर भाड्याने चालविण्याकरीता दिला असल्याने त्यांचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. तसेच टँकरमध्ये पकडलेले डिझेल कोठून आणले व कोठे विकणार होते, याची त्याला काहीही माहीती नाही. या गुन्ह्याची त्याचा काहीही संबंध नसल्याने जप्त केलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ त्याला परत मिळावा, असे नमुद केले आहे. तथापी, टँकरचे चालक व क्लिनर यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबावरुन अजय गोविंद यादव यांनी जाणीवपुर्वक सदर टँकरचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. टँकर मालकाने दिलेल्या निवेदनावरुन जरी सदरचा टँकर भाड्याने दिला असला, तसेच त्याचे अपरोक्ष जरी आरोपी यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
FICE

वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा टँकर मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. II ८७/२०११, दि.२६/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेल्या टँकरमधील डिझेलचा संपुर्ण एकूण ३१२१ लिटर्स साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर डिझेल साठ्याची पोलीसांनी वैध परवानाधारकांस अथवा प्रत्यक्ष वापरकर्त्याला प्रचलीत दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

२) जप्त करण्यात आलेला टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास टँकरचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी टँकरच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी. अथवा टँकर मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या टँकरची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा टँकर लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) घटनास्थळी जप्त करण्यात आलेली १ पितळी डिप इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे चालक, रामनरेश ठाकूरदिन वर्मा
२) टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे क्लिनर, हरिशंकर मोतीलाल यादव
३) टँकर क्र. एमएच-०४-एच-५६५२ चे मालक, बहादूर रामराव यादव
४) संजयकुमार वर्मा (ठेकेदार)
५) सुरेंद्रकुमार वर्मा (ठेकेदार)
६) अजय गोविंद यादव उर्फ कोल्हापूरी (ठेकेदार)
७) सायबर टेक कंपनीतील कर्मचारी संजय दयाशंकर सिंग
८) सायबर टेक कंपनीतील कर्मचारी प्रविण विनायक परब

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वागळे इस्टेट पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.